# साय-फाय करंडक २०१८ साठी सादर केला चषक

पुणे : आघाडीची आयटी सिक्युरिटी सोल्युशन्स पुरविणारी कंपनी असलेल्या क्वीक हील टेक्नॉलॉजीचा सीएसआर विभाग असलेले क्वीक हील फाऊंडेशनने आज सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेल्या अभिनव एकांकिका प्रयोगांच्या साय-फाय करंडक २०१८ या स्पर्धेसाठीच्या चषकाचे अनावरण केले. महाराष्ट्र सायबर आणि सुप्रसिद्ध थिएटर ग्रुप थिएटर अकादमीच्या साथीने १६ डिसेंबर २०१८ रोजी होत असलेल्या महाअंतिम फेरीसंदर्भात पुणे पोलिस आयुक्तालयात यासंदर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

ऑगस्ट २०१८ मध्ये जाहीर झालेल्या साय-फाय करंडकाच्या दुसऱ्या आवृत्तीला राज्यभरातून भरपूर प्रतिसाद मिळाला होता. १०० हून अधिक संघांनी सहभागी होण्यासाठी प्रवेशिका पाठविल्या होत्या. थिएटर अकादमीने अध्यक्ष व प्रसिद्ध नाट्य कलाकार प्रसाद पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर,गोवा आणि नागपूर येथे विभागीय ऑडिशन्स घेण्यात आल्या.

१६ डिसेंबरला आयोजित करण्यात आलेली साय-फाय करंडक २०१८ ची अंतिम फेरी 'सकल ललित कलाघर' आयोजित करणार आहे आणि अनेक मोठ्या व्यक्ती या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचे



प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध अभिनेते श्री.रितेश देशमुख उपस्थित असणार आहेत. तर प्रसिद्ध अभिनेते श्री आनंद इंगळे आणि श्री विजय केंकरे साय-फाय करंडकाच्या अंतिम फेरीचे परीक्षक म्हणून काम पाहणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून क्वीक हील फाऊंडेशनने सायबर सिक्युरिटी वाढविण्यासाठी शाश्वत उपक्रम हाती घेतला आहे व याद्वारे चांगले जग निर्माण करण्याची त्यांची कटीबद्धता आणखी अधोरेखित केली आहे. अंतिम फेरीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ९ संघांची निवड केली जाईल आणि सध्याचे डिजिटल आयुष्य तसेच आज भेडसावणारे धोके यासंदर्भात नाटक सादर करतील. चषकाचे अनावरण करताना क्वीक हील टेक्नॉलॉजीचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री.कैलाश काटकरम्हणाले म्हणालेम्हणालेम्हणाले म्हणाले,म्हणाले भौतिक आयुष्यातील धोक्यांपासून सुरक्षेसाठी भारतीय पुरेशी काळजी घेतात मात्र डिजिटल सुरक्षेला मात्र त्यांच्याकडून तितकेसे महत्व दिले जात नाही.